## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ५४४/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांकः—२९/०८/२०१६

**१) गैरकायदयाची मंडळी जमवुन जादुटोना केल्याच्या कारणावरुन जिवानीशी ठार मारल्याने गुन्हा नोंद. . :—**

दिनांक २७/०८/०१६ रोजी २०.४५ वा. दर. यातील १६ आरोपीतांनी गैरकायदयाची मंडळी एकत्र जमवुन कट रचुन मृतक १) यादवराव जानबा ढोक वय ६५ वर्ष २) सौ. कौशल यादवराव ढोक वय ५५ वर्ष दोन्ही रा. दावेझरीटोला हे होघेही पती पत्नी असुन हे जादुटोना करून लोकांना मारण्याच्या कारनावरून खुण करण्याच्या उद्देशाने गावातील सिताराम स्वामीचे मंदीरातुन बाहेर काढुन लाकठी काढयाने मारत मारत घरापर्यंत नेऊन दोघांनाही जिवेनासी ठार मारले व दोघांचे प्रेत पुरावा नष्ट करण्याचे उद्दशाने बंजारा खदानी मध्ये दगडाच्या चिपा खाली दाबुन ठेवले असे सरतर्फे फिर्यादी पोउपनि जायले पोलीस स्टेशन सिहोरा यांचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन सिहोरा येथे कलम १४७,१४८,१४९,३६४,४५०,३०२,२०१,१२०,(ब)भादंवि. सहकलम ४ महाराष्ट्र नरबळी आणी अमानुष अनिष्ठ अघोरीपन व जादुटोना प्रतिबंधक व उच्चाधन प्र.कायदा २०१३ सहकलम (३) (२) (५) अनुसुचित जाती जमाती अत्याचार प्र. कायदा १९८९ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास उपविभागिय पोलीस अधीकारी श्री जोगदंड भंडारा हे करीत आहेत. आरोपी अटक आहेत.

**२) शाळेतील सामानाची चोरी . :—**

दिनांक २७+२८/०८/२०१६ चे रात्र दरम्यान. यातील इंदुताई मेमोरीयल हॉयस्कुल मध्ये चोरी झाल्याचे स्वयंपाकी बाईने फिर्यादी यांना सांगीतले तेव्हा फिर्यादी याने जावुन पाहीले असता स्वंयपाक रूमच्या ताला तुटलेला दिसलेला पाहुन स्वंयपाक रूममधील २ नग गॅस सिलेडंर, बजाज कंपनीची कुकर , ०२ मोठे, जर्मन गंज, ०१ अॅम्पलीफायर, १ काम्पुटर किबोर्ड असा एकुण १३,०००/—रू. चा माल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेल्याने फिर्यादी किशोर ईस्तारी वंजारी वय ५० वर्ष रा. विनोबानगर तुमसर यांचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ४५७,३८० भादंवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. धार्मीक पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत.

**३) भांडण करुन बासाच्या काठीने मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक २८/०८/२०१६ रोजी १०.३० वा. यातील फिर्यादी जय गोपाल पुनाजी मानकर वय ३६ वर्ष, रा. बिरसा मुंडा चौक सेंदुरवाफा हा सेंदुरवाफा बोगदा येथे थांबुन आरोपीच्या सायकलच्या मागील कॅरीअर वरील एबीसीडी व बाराखडीचे चार्ट काढुन वाचत असतांना यातील आरोपीने तु मला न विचारता माझे सायकल वरील चार्ट का काढले याकारणावरुन भांडण करुन हातातील बासाचे काठीने राजाराम यांचे डोक्यावर मारुन दुखापत केल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३२४ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. पाटील पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

४)अवैध दारु/जुगार अडयांवर धाडी . :—

दिनांक २८/०८/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो.स्टे. कारधा, करडी, गोबरवाही, पवनी, अडयाळ, व लाखांदुर येथील अवैध दारु/जुगार अडयांवर धाडी घालुन एकुण ८ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ४० मिली हातभट्टी कि. २,४५० /—रू. व २ लिटर ७०० मिली देशी दारु कि. ७४० /—रु. तसेच जुगारातुन कि. ३,२२० असा एकुण ६,४१०/—रू. चा माल जप्त करण्यात आला.

(के.एच.धात्रक)
प्रभारी. पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ९८२३६३७२२०

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.